# कृषी कायद्याचे वास्तव विश्लेषण

**डॉ. मोहन सदामते**, सहयोगी प्राध्यापक, क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय कुंडल ता. पलूस सांगली.

………………………………………………………………………………………

- **घोषवारा:**

केंद्र सरकारने २० सप्टेंबर २०२० रोजी कृषी क्षेत्राशी संबंधित तीन कायदे मंजूर केले आहेत ते कायदे असे कीशेतकरी उत्पादने , ,२०२०कायदा (प्रोत्साहन व सुविधा) व्यापार व वाणिज्यशेतकरी सनकिंमत आश्वा (सशक्तीकरण आणि संरक्षण)आणि कृषी सेवा करार कायदा २०२० .सदर कायद्यांना शेतकऱ्यांचा विरोध आहे आणि त्यासाठीचं हे आंदोलने सुरू आहेत २०२०कायदा (दुरुस्ती) अत्यावश्यक वस्तू , .तपंजाबमधील शेतकरी कायदे मंजूर झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासूनच म्हणजे सप्टेंबरपासून ते आजतागायत आंदोलन करत आहेया तीन विधेयकाचे स्वरूप समजून घेणे व त्याच्या अंमलबजावणीतील अडचणी अभ्यासन्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध निबंधात केला आहे .

- **प्रस्तावांना** कृषी क्षेत्राच्या उन्नतीसाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने संसदेने आज दोन विधेयके मंजूर केली . उत कृषी्पन्न व्यापार व वाणिज्य विधेयक (प्रोत्साहन व सहाय्य), २०२० आणि हमीभाव आणि कृषी सेवा विधेयक २०२० विषयी शेतकरी लोकसभेने मंजूर केला (२०२०सप्टेंबर १) करार (सबलीकरण आणि संरक्षण), तसेच राज्यसभेने हे विधेयक मंजूर केलेकेंद्रीय कृषि व शेतकरी . कासकल्याण व ग्रामवि मंत्री तथा पंचायती राजमंत्री श्री नरेंद्रसिंह तोमर यांनी १ सप्टेंबर २०२० रोजी लोकसभेत हे विधेयक जून, २०२० रोजी आलेल्या अध्यादेशास कायद्यामध्ये बदलण्यासाठी सादर केले.

या विधेयकासंदर्भात बोलताना श्री नरेंद्रसिंह तोमर म्हणाले होते की, पंतप्रधान श्रीद्रनरें . मोदी यांच्या नेतृत्वात सरकारने गेल्या सहा वर्षात शेतकर्याना चांगला भाव मिळावा आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी कित्येक पावले उचलली आहेतते पुढे म्हणाले की धान्य खरेदी . आह ला आश्वासन दिले :पंतप्रधानांनी या संदर्भात स्वत .किमान आधारभूत किंमतीवर सुरूच राहीले- ते २०१४ .२०२० दरम्यान एमएसपीचे दर लक्षणीय वाढले आहेतचे केंद्रीय कृषिमंत्री म्हणाले की या बिलांमध्ये शेतकऱ्यां .येत्या आठवड्यात रब्बी हंगामातील एमएसपी जाहीर होईल . .संपूर्ण संरक्षण सुनिश्चित करण्यात आले आहे

पंजाब आणि हरियाणातील शेतकरी केंद्र सरकारने आणलेल्या तीन नव्या कृषी कायद्यांविरोधात गेल्या ६५ हून अधिक दिवसांपासून दिल्लीच्या सीमेवर आंदोलन करत आहेत .

खरं तर पंजाबमधील शेतकरी कायदे मंजूर झाल्याच्या दुसऱ्या दिवसापासूनच म्हणजे सप्टेंबरपासून आंदोलन करत आहेत. मात्र ऑक्टोबर पासून शेतकरी या आंदोलनानं आक्रमक रूप घेतलं आणि आता हे आंदोलन देशाच्या राजधानीच्या सीमेवर पोहोचलं आहेत्यामुळे . . केंद्र सरकारने या आंदोलनाची गंभीर दखल घेत चर्चेच्या फेऱ्या सुरू केल्या आणि त्याला फारसे यश आलेले नाही

या कृषी सुधारणा विधेयकातून शेतकऱ्यांचे हित जपले जाईल का ? या विधेयकांना देशातील काही राज्यातून विरोध का होत आहे ? त्या पाठीमागची कारणे व अडचणी काय आहेत ? हे प्रस्तुत शोध निबंधातून अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे .

❖ **कृषी कायदयाचे वास्तव विश्लेषण**

केंद्र सरकारने २० सप्टेंबर २०२० रोजी कृषी क्षेत्राशी संबंधित तीन कायदे मंजूर केले .त्या कायद्यांना शेतकऱ्यांचा का विरोध आहे हे अभ्यासणेसाठी कृषी कायदयाचे वास्तव विश्लेषण थोडक्यात पुढीलप्रमाणे केले आहे .

**तीन नवे कृषी कायदे**

- शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य २०२०कायदा (प्रोत्साहन व सुविधा)
- शेतकरी किंमत आश्वासन आणि (सशक्तीकरण आणि संरक्षण)कृषी सेवा करार कायदा २०२०
- अत्यावश्यक वस्तू २०२०कायदा (दुरुस्ती)

केंद्र सरकारने शेती क्षेत्राशी संबंधित तीन अध्यादेश आणले होते ज्यांचं रुपांतर आता कायद्यात करण्यात आलं आहेया कायद्यामधील . काय तरतुदी आहेत आणि त्यावर काय आक्षेप घेतले जातात, हे अभ्यासणे गरजेचे आहे .

❖ **पहिला कायदा- शेतकरी उत्पादने व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा २०२०**

हा कायदा कृषीमालाच्या विक्रीसंबंधी तरतुदी करतो. यातल्या प्रमुख तरतुदी काय आहेत -

- कृषी उत्पन्न बाजार समितीने मान्यता दिलेल्या बाजारांबाहेरही मालाची खरेदीविक्री-
- कृषीमालाच्या राज्यांतर्गत आणि आंतरराज्य हालचालीतील अडथळे दूर करणे.
- मार्केटिंग आणि वाहतूक खर्च कमी करून शेतकऱ्यांना अधिक चांगली किंमत मिळवून देणे.
- ट्रेडिंगसाठी व्यवस्था उपलब्ध करून देणे-

शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळावी आणि त्यांच्या मालाला लवकरात लवकर गिऱ्हाईक मिळावं यासाठी या सुविधा केल्या जात असल्याचं सरकारचं म्हणणं आहे. पण याबद्दल काही आक्षेपही आहेत.

**अडचणी**

- APMC बाहेर विक्री झाल्यास 'बाजार शुल्क' न मिळाल्याने राज्यांचं नुकसान होईल.
- बाजार समित्या हद्पार झाल्यास मध्यस्थ, आडते यांचं काय होणार?
- किमान आधारभूत किंमतीची यंत्रणा यामुळे मोडकळीस येईल
- e-NAM सारख्या ईबाजारच नामशेष झाले तर त्या कशा चालतील .ट्रेडिंग यंत्रणा बाजारांवर अवलंबून असतात-?

❖ **दुसरा कायदा - शेतकरी किंमत आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा (सशक्तीकरण आणि संरक्षण)2020**

हा कायदा कंत्राटी शेतीबद्दल आहे शेतकऱ्यांना ते घेत असलेल्या पिकासाठी आगाऊ स्वरुपात करार करता येण्याची तरतूद यात केलेली . या .पण याला कायदेशीर स्वरूप देण्याचा हा प्रयत्न आहे .भारतात सध्याही काही प्रमाणात अशाप्रकारची कंत्राटी शेती पाहायला मिळते .आहे कायद्यातल प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे .

- आपल्या पिकासाठी घाऊक विक्रेते, प्रोसेसिंग इंडस्ट्री किंवा कंपन्यांशी करार करता येईलत्यासाठी किंमतही ठरवता येईल .
- 5 हेक्टरपेक्षा कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यांना कंत्राटांचा फायदा होईल
- बाजारपेठेतल्या अस्थिरतेचा भार शेतकऱ्यांवर नाही त्यांच्या कंत्राटदारांवर राहील
- मध्यस्थांना दूर करून शेतकरी पूर्ण नफा मिळवू शकतात.

**अडचणी**

*शेती क्षेत्राचं उदारीकरणपण यात खरंच शेतकरी फायदा करून घेऊ .शेती क्षेत्राचं उदारीकरण करण्याचा हा प्रयत्न आहे असंही म्हटलं जातंय - शकतील का ही शंका उपस्थित केली जाते.*

- कंत्राटी व्यवस्थेत शेतकरी सक्षमपणे वाटाघाटी करू शकतील का?
- अनेक लहानलहान शेतकऱ्यांशी करार करण्यात व्यावसायिक रस दाखवतील का-?

❖ **तिसरा कायदा - अत्यावश्यक वस्तू कायदा (दुरुस्ती)2020**

Essential Commodities (Amendment) Bill म्हणजे अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती)विधेयक हा तिसरा आहे, ज्यावरून वाद होतोययाच्या तरतुदी काय आहेत .सरकारने अनेक कृषी उत्पादनं या यादीतून वगळण्याचा निर्णय घेतलाय .?
डाळी, कडधान्यं, तेलबिया, कांदा, बटाटे यांना अत्यावश्यक वस्तूंच्या यादीतून वगळणेअपवा .यामुळे साठा करण्यावर निर्बंध राहणार नाहीत .द : युद्धसदृश असामान्य परिस्थिती

- निर्बंध कमी झाल्याने परकीय गुंतवणूक तसंच खासगी गुंतवणूकदारांचा ओघ वाढेल
- किमती स्थिर राहण्यात मदत होईलशेतकरी दोघांचा फायदा-ग्राहक .

या तरतूदींमुळे शेतकऱ्यांचं नुकसानच होईल असाच आरोप केला जातोय. नेमके काय अडचणी आहेत ते पाहणे गरजेचे आहे
**अडचणी-**

- मोठ्या कंपन्या वाटेल तेवढा साठा करू शकतील.
- शेतकऱ्यांना कंपन्यांच्या सांगण्याप्रमाणे उत्पादन करावं लागेल आणि कमी किंमत मिळण्याचीही भीती
- कांदा निर्यातबंदी सारख्या निर्णयांमुळे हा कायदा अंमलात आणला जाईल का याबद्दल साशंकता
- 2019-20 च्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात दिसून येतं की ECA मुळे साखर, कांदा आणि डाळींच्या किंमती वाढायच्या आणि साठेबाजांवर धाडी टाकण्यात फक्त व्यापारांचं शोषण व्हायचं."
- **निष्कर्ष**

  उपरोक्त तीन कृषी सुधारणा विधेयके पारित होताच देशातील कृषी क्षेत्रासाठी एक नवीन सुरवात झाली. ही तिन्ही विधेयके केंद्रीय कृषी मंत्रालया अंतर्गत येत असली तरी वेगवेगळी आहेत. एक विधेयक हे कृषी उत्पादन व्यापार आणि वाणिज्य (प्रोत्साहन व सहाय्य) विधेयक आहे, हे कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी)ला पर्यायी व्यवस्था देणाऱ्या कायद्याचे आहे. दुसरे विधेयक हे शेतकरी (सबलीकरण व संरक्षण) हमीभाव करार व कृषी सेवा विधेयक (करार शेती) संदर्भातले आहे. तर तिसरे विधेयक हे अत्यावश्यक वस्तू (सुधारणा) विधेयक हे कृषीमाल साठवण मर्यादा संदर्भातले आहे. या तिन्ही विधेयकांची वेगवेगळी विशेषता व वेगवेगळ्या तरतुदी आहेत.
- **संदर्भ :**


१. https://maharashtratimes.com/editorial/article/the-new-laws-are-anti-farmer/articleshow/78367398.cms
२. https://www.bbc.com/marathi/india-54211645
३. https://maharashtratimes.com/india-news/explained-what-is-farmers-bill-and-who-is-protesting-against-it/articleshow/.78235163cms
४. https://www.lokmat.com/editorial/will-new-agriculture-bill-benefit-mainly-farmers-or-corporates-a601/
५. https://instapdf.in/the-farmers-kisan-bill--2020hindi/
६. https://www.maxmaharashtra.com/max-kissan/what-is-farmer-bill-and-how-it-is-going-to-impact-farmers/96533/